**ग्रीन एकर रेसिडेंन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.**

**पत्ता :-** एस.नं.६६९/१ सी/२ ॲन्ड ६६९/३, बिबवेवाडी, पुणे:- ४११ ०३७

नोंदणी क्र.:- पीएनए/पीएनए-(१)/एचएसजी/(टिसी)/६२८५/०३-०४.दि.०२-०७-२००३

---

# पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

ग्रीन एकर रेसिडेंन्सी सहकारी गृहरचना संस्थेची पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १८.०५.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली सभेस .... पैकी ..... सभासद उपस्थित होते. सदर सभेस श्री.समीर वाघ यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत करून सभेचे कामकाज विषयानुसार सुरुवात करण्यास प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी यांना अनुमती देण्यात आली.

**विषय क्रमांक ०१:-** संस्थेचा फिजीबिलीटी रिपोर्ट सर्व सभासदांसमोर सादर करणे.

**ठराव क्रमांक ०१:-** श्री.संजय सर यांनी पहिल्यांदा आपल्या प्लॉट विषयी माहिती सांगितली आणि त्यानंतर जो आपला प्लॉट आहे तो ३३,६००.०४ स्क्वे.फुट इतका आहे आणि त्याच्यामध्ये एकुण बांधकाम हे ५१,११०.०४ कारपेट एवढे झाले आहे म्हणजचे, आहे त्या जागेवर दुप्पट बांधकाम करण्यात आले आहे याचे कारण असे कि तुमचा एकुण ले-आऊट मधला जो रो-हाऊसचा एरिया आहे तो ४२.०० गुंटयांचा आहे त्याचे विकसकाने संपुर्ण जमिनीचे मानीव अभिहस्तांतरण म्हणजेच (Conveyance Deed)त्याप्रमाणे करण्यात आले आहे. यामुळे आत्ताच्या नविन U-DCPR नियमाप्रमाणे जो आपला प्लॉट आहे तो ३३,६००.०४ स्क्वे.फुट इतका आहे आणि यावर मिळणारा एकुण टोटल जो एफ.एस.आय आहे त्यावर प्रोजेक्टची फिजिबिलीटी सर्वसाधारणपणे

बसत नाही तरी,सभासदांना या गोष्टीची कल्पना देण्यात येऊन सर्व सभासदांच्या शंकांचे निरसन करण्यात आले आणि त्याच्यानुसार फिजिबिलीटीला सभासदांकडुन मान्यता देण्यात आली.

सुचक:-

अनुमोदक:-

**विषय क्रमांक ०२ :-** संस्थेच्या फिजीबिलीटी रिपोर्ट संदर्भात चर्चा करणे.

**ठराव क्रमांक ०२:-** संस्थेच्या फिजीबिलीटी रिपोर्ट संदर्भात चर्चा करताना काही सभासदांचे अंतर्गत सदनिकेची कारपेट एरिया मोजणी केल्यानंतर काही सभासदांच्या एरियामध्ये तफावत जाणवत होती त्यांनी त्यानुसार त्यांचे मुद्दे मांडले परंतु सभेत असे ठरले की, आपण इंडेक्स-२ वर जो एरिया आहे त्यामध्ये १९ टक्के वजा करून सरसकट जो एरिया आहे तो धरण्यात यावा असा बहुमताने सभेमध्ये सभासदांनी आपले मत मांडले आणि त्यामध्ये एक मुद्दा असा सुध्दा चर्चेचा आला की, काही सभासदांचे एरिया मोजायचे की नाही याबाबत संदिग्धता आहे यासंदर्भातील पुढील कार्यवाही पुनर्विकास समिती आणि सभासद एकत्रित मिळुन याबाबत निर्णय घेणार होते.

सुचक:-

अनुमोदक:-

**विषय क्रमांक ०३:-** पुढील कार्यवाहीची दिशा ठरविणे.

**ठराव क्रमांक ०३:-** श्री.संजय सुर्यवंशी यांनी टेंडर संदर्भात सुध्दा संपुर्ण माहीती देण्यात आली तसेच टेंडर संदर्भात आधीच विकसक संस्थेकडे त्या दृष्टीकोनातुन पाहत आहे आणि विकसक टेंडर भरून द्यायला सुध्दा तयार आहे या अनुषंगाने पुनर्विकास समितीने प्रस्ताव दिल्यानंतर विशेष सर्वसाधरण सभेच्या निर्णयानुसार आपण टेंडर प्रोसेसला पुढे जाण्याचे ठरले त्याच्यामध्ये टेंडर संदर्भातील माहीती दिलीच आहे तेच डॉक्युमेंट संस्थेकडे पाठवुन त्याबदद्लच्या सुचना पुढील १५ दिवसांत घेण्यात येतील

Reg. No. PNA/(PNA)/HSG(TC)/8285 2003-04

आणि त्याच्यानंतर टेंडरची दिनांक फायनल करण्यात येऊन टेंडर प्रोसेस चालु करण्यात येईल यासंदर्भातील कार्यवाहीचे अधिकार पुनर्विकास समितीला देण्यात आले.

सुचक:- अनुमोदक:-

यानंतर श्री. समीर वाघ यांनी उपस्थित राहिलेल्या सर्व सभासदांचे आणि प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी आणि वास्तुविशारद म्हणून काम पाहणारे चैतन्य पेशवे यांचे संस्थेच्या वतीने आभार मानले आणि आजची सभा संपल्याचे जाहीर केले.

**ग्रीन एकर रेसिडेंन्सी सहकारी गृहरचना संस्थेच्या वतीने**

**अध्यक्ष** **सचिव** **खजिनदार**